# समग्र शिक्षा , शिक्षण विभाग (प्राथ) जिल्हा परिषद अहमदनगर

## कॅल लॅब (संगणक प्रयोगशाळा)

**उद्देश -** स्थानिक स्वराज्य संस्थाच्या उच्च प्राथमिक शाळांमध्ये कॅल लॅब (संगणक प्रयोगशाळा) स्थापन करुन उच्च प्राथमिक वर्गातील विद्यार्थ्यांना संगणक शिक्षण, शैक्षणिक आज्ञावली इ. माध्यमातून तसेच संगणकाच्या मदतीने शिक्षण देण्यासाठी सदर कॅल लॅब चा प्रभावीपणे वापर करणे.

समग्र शिक्षा अभियानामध्ये (पूर्वीचे सर्व शिक्षा अभियान) कॅल लॅब उपक्रम (संगणक प्रयोगशाळा) अंतर्गत सन २०१७-१८ पर्यंत महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद मुंबई कार्यालयाकडून स्थानिक स्वराज्य संस्थाच्या १९६ जि प उच्च प्राथमिक शाळांमध्ये कॅल लॅब (संगणक प्रयोगशाळा) स्थापित करण्यात आलेल्या आहेत. त्यासाठी महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद मुंबई कार्यालयाच्या स्तरावर मार्गदर्शक सूचनांनुसार स्थानिक स्वराज्य संस्थाच्या उच्च प्राथमिक शाळांची निवड करण्यात आली. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळामधील उच्च प्राथमिक वर्गातील विद्यार्थ्यांना संगणक शिक्षण, शैक्षणिक आज्ञावली इ. माध्यमातून तसेच संगणकाच्या मदतीने शिक्षण देण्यासाठी सदर कॅल लॅब चा प्रभावी वापर होतो. तसेच समग्र शिक्षा अभियान अंतर्गत जि प उच्च प्राथमिक शाळांमध्ये सन २०२२-२३ मध्ये हा उपक्रम राबविणेबाबत अद्याप मार्गदर्शक सूचना महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद मुंबई कार्यालयाकडून अप्राप्त आहे.